# महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ

**MAHARASHTRA STATE BIODIVERSITY BOARD**

(Established under section २२ of the Biological Diversity Act, २००२)

msbb-ngp@gov.in / msbb.ngp@gmail.com; ०७१२-२५२२९८२ / ८४

**जैवविविधता भवन,कदीमबाग,सिव्हील लाईन्स,नागपूर** Jaiv Vividhata Bhavan, Kadimbag, Civil Lines, Nagpur४४०००१

## सेवानिवृत्त अधिकारी व ईतर अर्जदार यांची सेवा करार पध्दतीने घेणेकामी जाहीरात

महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाकरीता **तांत्रीक अधिकारी (Technical Officer)** यांची सेवा विवक्षीत कामाकरीता करार पध्दतीने तसेच **तज्ञ समंत्रक (Expert Consultant)** यांची सेवा मासिक मानधन तत्वावर ११ महिन्याचे अटीवर करार पध्दतीने नेमणुक करावयाची असुन त्याकामी नमूद करण्यात आलेल्या अटी व शर्तीची पुर्तता करणारे सेवानिवृत्त अधिकारी व ईतर अर्जदार यांचेकडुन अर्ज मागविण्यात येत आहेत.

| **अ.क्र.** | **पदाचे नांव** | **थोडक्यात कामाचे स्वरुप** | **पद संख्या** |
|---|---|---|---|
| १ | तांत्रीक अधिकारी (Technical Officer) | जैवविविधता अधिनियम-२००२, जैवविविधता अधिनियम (सुधारीत) २०२३ नुसार जैविक साधनसंपत्ती व संबंधित पारंपारीक ज्ञान याकरीता डेटाबेस उभारणी करणे व माहिती व डाक्युमेंटेशन यंत्रणा निर्माण करणे, याकरीता उपाययोजना करण्याची कामे करणे, राज्य जैविक विविधता धोरण व कृती आराखडयाचे अद्यावतीकरण व अंमलबजावणी सुलभ करणे इत्यादि कामे करणे, जैवविविधता संवर्धनबाबत तांत्रीक सहाय्य व मार्गदर्शनात्मक कामे करणे ईत्यादी. | ०२ |
| २ | तज्ञ समंत्रक (Expert Consultant) | जैवविविधता अधिनियम-२००२, जैवविविधता अधिनियम (सुधारीत) २०२३) या कायदा अंतर्गत जैविक विविधतेचे संवर्धन, तिच्या घटकाचा ते निरंतरपणे टिकुन राहतील अशाप्रकारे वापर आणि जैविक साधनसंपत्तीच्या ज्ञानाच्या वापरातुन प्राप्त् होणाऱ्या लाभांचे रास्त व समन्यायी वाटप यासंबंधिची तांत्रीक व आकडेवारी संबंधीची माहिती, नियम पुस्तीका, संहिता, मार्गदर्शक तत्वे इत्यादि संबंधि माहिती संकलीत करुन प्रसिध्द करण्याचे काम करणे. जैवविविधता व्यवस्थापन समिती व लोक जैवविविधता नोंदवही संबंधात कार्यशाळा आयोजित करणे. | ०१ |

**अर्ज सादर करण्याचा कालावधी व पध्दत** – दिनांक २१.०३.२०२५ ते दिनांक ०४.०४.२०२५ अखेर (सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) असेल. अर्जदाराने विहीत नमुन्यात अर्ज व इतर सर्व कागदपत्रे छायांकित करुन सुस्पष्ट प्रती स्कॅन करुन दिनांक ०४.०४.२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत msbb-ngp@gov.in या ईमेल आयडीवर पोहचेल अशा प्रकारे पाठवावे. विहीत तारखेनंतर मिळालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. प्राप्त अर्जाची छाननी करुन पात्र अर्जदारांना मुलाखतीकरीता ईमेलव्दारे सुचित करण्यात येईल.

**अर्ज सादर करणेचा पत्ता** :- महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ, नागपूर जैवविविधता भवन, कदीमबाग, सिव्हील लाईन्स, नागपूर- ४४०००१ कार्यालयाचा शासकिय ईमेल आयडी - msbb-ngp@gov.in

सविस्तर जाहीरात व अर्जाचा नमुना शासकिय www.mahaforest.gov.in - msbb.mahaforest.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

**स्वा/-**
**(डॉ. शिवबाला एस., भावसे)**
**सदस्य सचिव**
**महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ, नागपूर**

<u>**तांत्रीक अधिकारी या पदासाठी लागु असलेल्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे.**</u>

**अटी व शर्ती** :-

१. तांत्रीक अधिकारी या पदासाठीचा अर्जदार हा वन वनविभागातुन विभागीय वन अधिकारी या पदावरुन सेवानिवृत्त झालेला असावा.

२. अर्जदार विभागीय वन अधिकारी या पदावरुन शासन सेवेतुन दिनांक ०१.०१.२०२४ ते दिनांक ३१.०३.२०२५ या कालावधीमध्ये सेवानिवृत्त होत असलेला किंवा झालेला असावा.

३. करार पध्दतीने नुियक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांचकडे विवक्षित कामासाठी लागणारी विशेष अर्हता अथवा संबंधित पदावर किमान एक वर्षाचा अनुभव असावा.

४. विवक्षित कामासाठी करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांची निवड प्रक्रिया व नियुक्ती करताना महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि. १७.१२.२०१६ मधील तरतुदींचा अवलंब करण्यात येईल.

५. करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्ती वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहु शकतील. तथापी कोणत्याही परिस्थितीत करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्ती वयाच्या ७० व्या वर्षापर्यंत कार्यरत राहु शकतील.

६. उमेदवारास मराठी, इंग्रजी व हिंदी भाषेचे संपुर्ण ज्ञान असणे आवश्यक आहे.

७. करार पध्दतीने नुियक्ती करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी हा शारिरीक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा. तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्यांच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

८. करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्या विरुध्द कोणतीही विभागीय चौकशी किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी. तसेच कोणत्याही प्रकारचे न्यायालयीन प्रकरण प्रलंबित नसावे.

९. सेवानिवृत्त अधिकारी यांची करार पध्दतीने करण्यात येणारी नियुक्ती ही नियमित स्वरुपाच्या कामकाजासाठी न करता केवळ विवक्षित कामासाठीच करण्यात येत असलेने, संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे/सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.

१०. सदरची सेवा ही करार पध्दतीने असल्याने, नियुक्तीची सेवा समाप्त करण्याचा अधिकार सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ, नागपूर यांना राहील.

११. करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी हा सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावा.

१२. करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांनी गुंतलेले हितसंबंध (Conflict of Interest) जाहीर करणे आवश्यक राहील.

१३. करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांनी त्यांना प्राप्त होणा-या माहिती /कागदपत्रे/आधार सामुग्रीबाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील.

१४. करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे बंधनकारक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मुल्यमापन करतील.

१५. सदर नेमणुक हि या करार पध्दतीने प्रथमतः एक वर्षाकरीता करण्यात येईल. एक वर्षानंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वाढविता येईल. तथापी अशी मुदत वाढवितांना एकावेळी ही मुदत एक वर्षापेक्षा अधिक असणार नाही, याची काळजी सदस्य सचिव घेतील. अशा प्रकारे जास्तीत-जास्त तीन वेळा नियुक्त करता येईल. त्यानंतर अशा उमेदवाराची पुनश्च नियुक्ती करणे आवश्यक आहे. असे सदस्य सचिव यांचे मत झाल्यास त्या उमेदवारास पुनश्च निवड प्रकियेस सामोरे जावे लागेल.

१६. करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकिय व वित्तीय अधिकार प्रदान करता येणार नाही.

१७. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण २७१५/प्र.क्र.१००/१३, दि.१७.१२.२०१६, अन्वये विहीत केलेल्या सर्व अटी व शर्ती तसेच विभागाने वेळोवेळी निश्चित केलेल्या सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

१८. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२७१५/प्र.क्र.-१०० (भाग-१)१३, दिनांक ०८.०९.२०२३ मधील तरतुदीनुसार मासिक व पारिश्रामिक भत्ते देण्यात येतील.

१९. सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ यांचा सदर निवड प्रक्रियेबाबत अंतिम निर्णय राहील.

## <u>तांत्रीक अधिकारी या पदाकरीता जबाबदाऱ्या :-</u>

१. जैवविविधता अधिनियम-२००२, जैविक साधनसंपत्तीचे प्रभावी व्यवस्थापन, प्रचालन आणि ती निरंतरपणे टिकुन राहील अशाप्रकारे तिचा वापर होईल याची सुनिश्चिती करण्यासाठी जैविक विविधता नोंदवहया आणि ईलेक्टॉनिक डाटा बेस यांच्या माध्यमातुन जैविक साधनसंपत्ती व संबंधित पारंपारीक ज्ञान याकरीता डेटाबेस उभारणी करणे व माहिती व डाक्युमेंटेशन यंत्रणा निर्माण करणे, जैवविविधता व्यवस्थापन समितत्यांचे सबळीकरण करण्याकरीता वेळोवेळी कार्यशाळेचे आयोजन करुन त्याप्रमाणे अंमलबजावणी करणे, याकरीता उपाययोजना करण्याची कामे करणे.

२. राज्य जैविक विविधता धोरण व कृती आराखडयाचे अद्यावतीकरण व अंमलबजावणी सुलभ करणे इत्यादि कामे करणे.

३. जैवविविधता संवर्धनबाबत तांत्रीक सहाय्य व मार्गदर्शनात्मक कामे करणे.

४. जैवविविधता अधिनियम-२००२, जैवविविधता अधिनियम (सुधारीत) २०२३ च्या अनुषंगाने सदस्य सचिव महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ यांनी सोपविलेली विविध कामे करणे.

## <u>नियुक्तीबाबत प्रक्रिया :</u>

करार पध्दतीने तांत्रीक अधिकारी या पदाकरीता अर्जदाराने त्याचे स्वतःचे संपुर्ण नांव, जन्म दिनांक, शैक्षणिक पात्रता, अनुभव, सेवानिवृत्तीचा आदेश (Pension Payment Order), पत्र व्यवहाराचा पत्ता, ई-मेल आयडी, दुरध्वनी / मोबाईल क्रमांक इत्यादि सुवाच्छ अक्षरात अथवा संगणकीकृत करुन नमुद करावा व स्वाक्षरी करावी. तसेच स्वतःचे अलिकडील काढलेले पासपोर्ट साईज फोटो अर्जावर चिकटवावा. तसेच विहीत नमुन्यात अर्ज सादर करावा. प्राप्त अर्जाची पडताळणी केल्यानंतर, अर्हता पुर्ण करणाऱ्या उमेदवारांची मुलाखतीव्दारे निवड करण्यात येईल. समितीमार्फत यशस्वी उमेदवारास नियुक्तीबाबत लेखी स्वरुपात सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य, जैवविविधता मंडळ यांचे मार्फत ईमेलव्दारे कळविण्यात येईल. व कार्यालयाचे नोटीस बोर्डावर दर्शविण्यात येईल. निवड झालेल्या उमेदवारास महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि.१७.१२.२०१६, मधिल विनिर्दिष्ट करारनामा करणे बंधनकारक राहील. शासनाच्या वतीने सदस्य सचिव महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ, हे करारनामा करतील. तसेच नियुक्तीबाबतचा अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ यांचा राहिल.

**सेवा करार पध्दतीने विवक्षित कामाकरीता घ्यावयाच्या तांत्रीक अधिकारी या पदाकरीता अर्जाचा नमुना**

**रंगित फोटो**

**प्रति**,

सदस्य सचिव
महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ, नागपूर
msbb-ngp@gov.in

**विषय**- सेवा करार पध्दतीने **तांत्रीक अधिकारी** या पदासाठी अर्ज.

**संदर्भ**- दैनिक.................................. दिनांक.............................मधील जाहिरात.

**महोदय**,

मी आपली संदर्भिय जाहिरात वाचली असून माझा वैयक्तिक तपशिल खालीलप्रमाणे आहे.

१. संपूर्ण नाव :-

२. जन्मतारीख अक्षरी व अंकी :-

३. संपूर्ण पत्ता :-

४. मोबाईल क्रमांक :-

५. ई मेल आयडी :-

६. शैक्षणिक पात्रता :-

७. सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी पदनाम :-

८. शासकीय सेवेत रुजू दिनांक :-

९. शासकिय सेवेत सेवानिवृत्तीचा दिनांक :-

१०. सेवानिवृत्तीच्या वेळेचे वेतन अथवा सेवानिवृत्ती वेळचे निवृत्ती वेतन :-

११. अनुभव :-

**ठिकाण** :- **अर्जदाराचे संपूर्ण नाव व**
**दिनांक** :- **सही**

(**टिप** :- अर्जासोबत शैक्षणिक पात्रता व इतर तत्सम कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रती आणि सेवानिवृत्ती वेळी घेत असलेले वेतन अथवा सेवानिवृत्ती वेतन मिळत असलेला तपशिल स्कॅन करुन ईमेल करावा.)

# <u>प्रमाणपत्र</u>

मी श्री / श्रीमती………………………………………………………………………….याव्दारे प्रमाणित करतो / करते कि, या अर्जामध्ये नमुद केलेली माझी माहिती ही पुर्णपणे खरी आहे. माहिती चुकीची किंवा खोटी आढळलेस मी नेमणुकीचे प्रक्रियेमधुन वगळण्यास पात्र ठरेन. तसेच माझी उक्त पदी निवड झाल्यास महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२७०५//प्र.क्र.१००/१३, दिनांक १७/१२/२०१६ चे शासन निर्णयाप्रमाणे मधील नमुद सर्व अटी / शर्ती मला मान्य राहतील.

ठिकाण –<br>दिनांक –

आपला / आपली विश्वासु<br>(अर्जदाराची स्वाक्षरी नावासंह)

## तज्ञ समंत्रक (Expert Consultant) या पदासाठी लागु असलेल्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे.

अटी व शर्ती :

१. उपरोक्त नमूद करण्यात आलेल्या विवक्षित कामासाठीचा अर्जदार हा नामांकित विद्यापिठातुन पी.एच.डी.झालेला असावा.
२. करार पध्दतीने नियुक्ती करण्यात येणाऱ्या अर्जदाराची शैक्षणीक अर्हता हि वनस्पती शास्त्र Botany / प्राणीशास्त्र Zoology / सामाजिक कार्य Social Work / समाजशास्त्र Sociology / जैव तंत्रज्ञान Bio Technology / वनशास्त्र Forestry / मत्सविज्ञान Fisheries / किंवा कृषीशास्त्र Agriculture या शास्त्रातील पी.एच.डी. धारक असावा.
३. करार पध्दतीने नियुक्ती करण्यात येणाऱ्या अर्जदारास जैवविविधतेबाबत उत्कटता आणि संशोधनात अनुभव असणे आवश्यक आहे.
४. जैवविविधता संवर्धन क्षेत्रात काम केल्याचा अनुभव असणाऱ्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.
५. उमेदवारास मराठी, इंग्रजी व हिंदी भाषेचे संपुर्ण ज्ञान असणे आवश्यक आहे.
६. करार पध्दतीने नुियक्ती करावयाच्या अर्जदार हे शारिरीक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा. तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्यांच्याकडे आवश्यक क्षमता असावी.
७. करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या **तज्ञ समंत्रक** (**Expert Consultant**) यांच्या विरुध्द कोणतीही न्यायालयीन चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी. तसेच कोणत्याही प्रकारचे न्यायालयीन प्रकरण प्रलंबित नसावे.
८. **तज्ञ समंत्रक** (**Expert Consultant**) यांची करार पध्दतीने करण्यात येणारी नियुक्ती ही नियमित स्वरुपाच्या कामकाजासाठी न करता केवळ विवक्षित कामासाठीच करण्यात येत असलेने, संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे/सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.
९. सदरची सेवा ही करार पध्दतीने असल्याने, नियुक्तीची सेवा समाप्त करण्याचा अधिकार सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ, नागपूर यांना राहील.
१०. करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या अर्जदार यांनी गुंतलेले हितसंबंध (Conflict of Interest) जाहीर करणे आवश्यक राहील.
११. करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या अर्जदार यांनी त्यांना प्राप्त होणा-या माहिती /कागदपत्रे/आधार सामुग्रीबाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील.

१२. करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या अर्जदार यांनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे बंधनकारक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मुल्यमापन करतील.

१३. सदर नेमणुक हि या करार पध्दतीने प्रथमतः ११ महिन्याकरीता करण्यात येईल. त्यानंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वाढविता येईल्. तथापी अशी मुदत वाढवितांना एकावेळी ही मुदत ११ महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही, याची काळजी सदस्य सचिव घेतील. अशा प्रकारे जास्तीत-जास्त तीन वेळा नियुक्त करता येईल्. त्यानंतर अशा उमेदवाराची पुनश्च नियुक्ती करणे आवश्यक आहे. असे सदस्य सचिव यांचे मत झाल्यास त्या उमेदवारास पुनश्च निवड प्रकियेस सामोरे जावे लागेल.

१४. करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकिय व वित्तीय अधिकार प्रदान करता येणार नाही.

१५. **तज्ञ समंत्रक** (Expert Consultant) यांना मासिक पारिश्रमिक मानधन रुपये ४५,०००/- (अक्षरी- पंचेचाळीस हजार रुपये फक्त) इतके देय राहील.

१६. सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ यांचा सदर निवड प्रक्रियेबाबत अंतिम निर्णय राहील.

## तज्ञ समंत्रक (Expert Consultant) या पदाकरीता जबाबदाऱ्या :-

१. जैवविविधता अधिनियम-२००२, जैवविविधता अधिनियम (सुधारीत) २०२३) या कायदा अंतर्गत जैविक विविधतेचे संवर्धन, तिच्या घटकाचा ते निरंतरपणे टिकुन राहतील अशाप्रकारे वापर आणि जैविक साधनसंपत्तीच्या ज्ञानाच्या वापरातुन प्राप्त् होणाऱ्या लाभांचे रास्त व समन्यायी वाटप यासंबंधिची तांत्रीक व आकडेवारी संबंधीची माहिती, नियम पुस्तीका, संहिता, मार्गदर्शक तत्वे इत्यादि संबंधि माहिती संकलीत करुन प्रसिध्द करण्याचे काम करणे. जैवविविधता व्यवस्थापन समिती व लोक जैवविविधता नोंदवही संबंधात कार्यशाळा आयोजित करणे.

२. जैविक विविधता संवर्धनाबाबत संशोधन प्रकल्प राबविणे तसेच विद्यापिठ किंवा संशोधन संस्था यांना मंडळाकडुन देण्यात येणारे संशोधन प्रकल्प यामध्ये समन्यव राखणे.

३. महाराष्ट्रातील स्थानिक प्रजातींच्या अभ्यास व संरक्षण, आणि जैवविविधतेशी संबंधित नवीन धोरणांवर कामे करणे.

४. महाराष्ट्रातील जैवविविधता संबंधीत नकाशे तयार करणे.

## नियुक्तीबाबत प्रक्रिया :

करार पध्दतीने **तज्ञ समंत्रक** (Expert Consultant) या पदाकरीता अर्जदाराने त्याचे स्वतःचे संपुर्ण नाव, जन्म दिनांक, शैक्षणिक पात्रता, अनुभव, पत्र व्यवहाराचा पत्ता, ई-मेल आयडी, दुरध्वनी / मोबाईल क्रमांक इत्यादि सुवाच्छ अक्षरात अथवा संगणकीकृत करुन नमुद करावा व स्वाक्षरी करावी. व अर्जासोबत शैक्षणिक पात्रता व इतर तत्सम मागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रती स्कॅन करुन ईमेलवर पाठवाव्यात. तसेच स्वतःचे अलिकडील काढलेले पासपोर्ट साईज फोटो अर्जावर चिकटवावा. तसेच विहीत नमुन्यात अर्ज सादर करावा. या कार्यालयाव्दारे गठीत समितीमार्फत उमेदवारांकडुन प्राप्त अर्जाची पडताळणी केल्यानंतर, अर्हता पुर्ण करणाऱ्या उमेदवारांची मुलाखतीव्दारे निवड करण्यात येईल. समितीमार्फत यशस्वी उमेदवारास नियुक्तीबाबत लेखी स्वरुपात सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य, जैवविविधता मंडळ यांचे मार्फत ईमेलव्दारे कळविण्यात येईल. व कार्यालयाचे नोटीस बोर्डावर दर्शविण्यात येईल. निवड झालेल्या उमेदवारास करारनामा करणे बंधनकारक राहील. शासनाच्या वतीने सदस्य सचिव महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ, हे करारनामा करतील. तसेच नियुक्तीबाबतचा अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ यांचा राहिल.

**सेवा करार पध्दतीने घ्यावयाच्या तज्ञ समंत्रक (Expert Consultant) या पदाकरीता अर्जाचा नमुना**

**रंगित फोटो**

**प्रति**,

सदस्य सचिव
महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ, नागपूर
msbb-ngp@gov.in

**विषय**- सेवा करार पध्दतीने **तज्ञ समंत्रक** (**Expert Consultant**) या पदासाठी अर्ज.

**संदर्भ**- दैनिक.................................... दिनांक..............................मधील जाहिरात.

**महोदय**,

मी आपली संदर्भिय जाहिरात वाचली असून माझा वैयक्तिक तपशिल खालीलप्रमाणे आहे.

१. संपूर्ण नाव :-

२. जन्मतारीख अक्षरी व अंकी :-

३. संपूर्ण पत्ता :-

४. मोबाईल क्रमांक :-

५. ई मेल आयडी :-

६. शैक्षणिक पात्रता :-

७. अनुभव :-

**ठिकाण** :- **अर्जदाराचे संपूर्ण नाव व**
**दिनांक** :- **सही**

(**टिप** :- अर्जासोबत शैक्षणिक पात्रता व इतर तत्सम कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रती स्कॅन करुन ईमेल करावा.)

# <u>प्रमाणपत्र</u>

मी श्री / श्रीमती…………………………………………………………………………….याव्दारे प्रमाणित करतो / करते कि, या अर्जामध्ये नमुद केलेली माझी माहिती ही पुर्णपणे खरी आहे. माहिती चुकीची किंवा खोटी आढळलेस मी नेमणुकीचे प्रक्रियेमधुन वगळण्यास पात्र ठरेन. तसेच माझी उक्त पदी निवड झाल्यास महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळानी घेतलेल्या किंवा जाहीर निर्णयाप्रमाणे नमुद सर्व अटी / शर्ती मला मान्य राहतील.

ठिकाण –  
दिनांक –

आपला / आपली विश्वासु  
(अर्जदाराची स्वाक्षरी नावासंह)